# Greenlawns School, Worli

**सहामाही परीक्षा (प्रथम सत्र २५-२६)**

**मराठी**

**इयत्ता:- आठवी** **पूर्णांक:- ८०**

**दिनांक:- १९ .०९.२०२५** **वेळ –२ तास**

**सूचना :- सगळे प्रश्न अनिवार्य आहेत.**

**शुद्ध भाषा व सुवाच्य लेखन अपेक्षित आहे.**

---

**प्र. १) खालील पैकी एका विषयावर निबंध लिहा :-. (१०)**

**१.माझा आवडता खेळ**

**२.बागेतील एक संध्याकाळ**

**३. मी शिक्षक झालो तर...**

**प्र.२) गरीब विद्यार्थी फंडातून गणवेश व वहया - पुस्तके मिळवण्यासंबधी विनंती पत्र आपल्या शाळेच्या मुख्याध्यापकांना लिहा. (७)**

**प्र. ३) खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**महात्मा गांधी हे भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे जनक मानले जातात. त्यांचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी पोरबंदर येथे झाला. इंग्लंडमध्ये शिक्षण घेतल्यानंतर ते वकील झाले. परंतु दक्षिण आफ्रिकेत त्यांना वर्णद्वेषाचा कटू अनुभव आला. त्या घटनेने त्यांच्या जीवनाची दिशा बदलली. त्यांनी सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह या तत्त्वांचा अंगीकार केला.**

**गांधीजींनी भारतात परतल्यानंतर स्वातंत्र्यलढ्यात नवे धोरण आणले. त्यांनी शेतकरी, मजूर, स्त्रिया, विद्यार्थी अशा सर्वसामान्य लोकांना स्वातंत्र्यलढ्यात सहभागी करून घेतले. मिठाचा सत्याग्रह, चळवळी, भारत छोडो आंदोलन या त्यांच्या संघर्षमय कारवायांनी ब्रिटिश साम्राज्य हादरले.**

**गांधीजींच्या नेतृत्वात स्वातंत्र्यलढा हा केवळ राजकीय चळवळ राहिला नाही, तर तो सामाजिक आणि नैतिक जागृतीचाही मार्ग बनला. स्वच्छता, अस्पृश्यता निवारण, ग्रामविकास, स्वदेशी या उपक्रमांतून त्यांनी देशाला स्वावलंबनाची शिकवण दिली.**

**आजही जगभरात गांधीजींचे विचार तितकेच महत्त्वाचे आहेत. संघर्ष, द्वेष, हिंसा यांचा काळोख घालवून अहिंसा आणि सत्याचा प्रकाश पसरवणे – हीच त्यांची खरी शिकवण आहे.**

**प्रश्नः**

१) गांधीजींचा जन्म केव्हा व कुठे झाला? (२)

२) गांधीजींनी देशाला कशाची शिकवण दिली ? (२)

३) गांधीजींनी कोणती तत्त्वे स्वीकारली? (२)

४) त्यांच्या नेतृत्वाखाली कोणत्या चळवळी झाल्या? (२)

५) वाक्य बनवा:- भारत, विद्यार्थी (२)

## <u>व्याकरण - विभाग</u>

**प्रश्न ४) अ) समानार्थी शब्द लिहा :-** (२)

१. कुंज-

i) वन ii) जन iii) लहान iv) वृक्ष

२. अवशेष-

i) शील्लक ii) शिललक iii) शिल्लक iv) शील्लख

**आ ) विरुद्धार्थी शब्द लिहा :-.** (२)

१. जागृत

i) निद्रिसत ii) निद्रीस्त iii) निद्रिस्त iv) निदिस्त

२. विरोधक

i) नायक ii) समर्थन iii) जनक iv) समर्थक

**इ) लिंग बदला :-** (२)

१. गुन्हेगार-

i) गुन्हेगारी ii) गून्हेगारी iii) गुन्हेगारीन iv) गुन्हेगारीण

२. कार्यकर्ता -

i) कार्यकर्ती ii) कार्यकर्ते iii) कार्यकारीण iv) कार्यकरी

**ई ) वचन बदला :-.** **(२)**

**१. पायरी-**

i) पायरे ii) पायाऱ्या iii) पायऱ्या iv) पयारी

**२. छडी-**

i) छडिया ii) छड्या iii) छाडि iv) छडे

**उ) रेखांकित विकारी शब्दांचा प्रकार लिहा:-** **(३)**

i ) <u>नागपंचमी</u> सारखाच हा मोठा सण आहे.

ii) परीक्षेसाठीच तो <u>सरकारी</u> शाळेत जायचा.

iii) विक्रमने मुलांना पुस्तके <u>दिली.</u>

**ऊ) खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हे वापरून ती वाक्ये पुन्हा लिहा.** **(२)**

i ) त्याने लगेच या निमंत्रणाची माहिती आपले मित्र धैर्य प्रशांत अमन आणि सक्षम यांना दिली

ii) दुकानदार म्हणाला मुलांनो तुम्ही आपले काम करा

## <u>साहित्य – विभाग ( अंक – ४० )</u>

**प्र. ५ ) अ) खालील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :-** **(९)**

१. ईशान व त्याचे सहकारी यांनी यात्रेकरुना केलेली मदत तुमच्या शब्दात लिहा.

२. निसर्ग आपल्याला नाना कला शिकवतो या विधानाचा तुम्हाला समजलेला अर्थ स्पष्ट करा.

३. 'तुमच्या इच्छा तीव्र असतील तर साधनांशिवाय साधना करता येते. 'या विधानाचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा.

**आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :-** **(४)**

१) लेखकाने पाठात त्यांच्या खेड्याचे सांगितलेले वैशिष्ट्ये लिहा.

२) "येथे पहाडावर वस्तू याच भावाने मिळतात." हे वाक्य कोण-कोणास म्हणाले?

३) ' नांद्रुक' म्हणजे काय?

४) लेखकाचे प्राथमिक शिक्षण कोठे झाले?

**इ) एका शब्दात उत्तरे लिहा :-** **(४)**

१) बहादुरीच्या कार्यासाठी मिळणारे पदक -

२) चित्र काढण्यासाठी वापरला जाणारा कागद -

३) अनेक तासांच्या व थकवणाऱ्या चढाईनंतर सर्व मित्र पोहचले ते ठिकाण -

४) घोड्याच्या शेडाला काय म्हणतात -

**ई) खालील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :-** **(४)**

१) ________गेम खेळून ईशानला कंटाळा आला होता.

२) बांबूची कोवळी काडी घेऊन पुढचं टोक टोचलं, की त्याचा ________ व्हायचा.

३) उत्तर ________गिर्यारोहण संस्थेचा संदेश वाचल्यावर ईशान फारच खूश झाला.

४) उंच ________ गिर्यारोहण करणे काही सोपे नव्हते.

**उ) शब्दार्थ लिहा :-** **(४)**

१. रौद्ररूप - २. भूस्खलन - ३. आपसूक - ४. गडप -

## कविता – विभाग

**प्र. ६) अ) कवितेच्या आधारे खालील घटकांपासून कवीने काय शिकले ते लिहा:-** **(३)**

१. पणती - २. पक्षी - ३. चंद्र, चांदणे-

**आ ) एका शब्दांत उत्तरे लिहा :-** **(३)**

१) वृक्षाचा गुण-

२) सागराला जीव लावणारी-

३) 'जीवन गाणे' या कवितेच्या कवीचे नाव-

**इ) खालील दिलेल्या कवितेच्या ओळी पूर्ण करा:-** (४)

प्रेम ---------------------

-----------------------------

----------------------------

----------------------------- गेले !

**ई) खालील दिलेल्या शब्दांचे कवितेतील यमक जुळणारे शब्द लिहा:-** (२)

१. गाणे - २. हौसले -

**उ)शब्दार्थ लिहा :-.** (३)

१. बुलंद - २.घाव सोसणे - ३. मंजुळ -

-----------×समाप्त ×----------------